






डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–२)



प्रकाशकः

डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net


डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

किंमत रू.

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# उंदीर व बेडूक



एका उंदराची एका बेडकाशी खूप ओळख होती. उंदराचे बीळ होते एका झाडाखाली. तर बेडकाचे घर होते एका नदीत. एकदा

उंदराने बेडकाला आपले घरी जेवायला बोलावले. मग बेडकानेही उंदराला आपले घरी बोलावले. पण तिथे उंदीर कसा जाणार? उंदराला पोहायला कुठे येत होते? दोघेही विचारात पडले. विचार करता करता बेडकाला एक उपाय सुचला."आपले दोघांचे पाय एकमेकांना बांधूया. मला चांगले पोहता येते मी तुला घेऊन जाईन परतही आणून सोडीन. कशी वाटते ही आयडीया?" बेडकाने उंदराला विचारले.



धावत जाऊन तो एक दोरी घेऊन आला आणि पाय पुढे करून बेडकासमोर बसला. बेडकाने दोघांचेही पाय चांगले, सुटणार नाहीत असे बांधले आणि मारली उडी नदीत. थोडावेळ उंदराला गंमत वाटली पण मग नाकातोंडात पाणी जाऊ लागले तसा तो घाबरला. घाबरून ओरडू लागला.उंदराला घेऊन बेडकालाही पोहणे जड जाऊ लागले.

आकाशातून एक घार जात होती. कुठे काही खायला मिळते

का ते बारीक नजरेने बघत होती. तिला उंदराचा आवाज ऐकू गेला. बेडकाची धडपडही दिसली. तिने एकदम खाली झेप घेतली आणि सटकन उंदराची मानगूट पकडून आकाशात दिसेनाशी झाली.

बिचारा उंदीर आणि बिचारा बेडूक. जेवण राहीले बाजुलाच आणि जीव गमावून बसले.

काहीही करताना आधी पुरता विचार करावा नाहीतर फसगत होऊ शकते हे आले ना लक्षात?

❑❑❑



## सिंह आणि उंदीर

एक सिंह दररोज एका झाडाखाली निजत असे. जवळच एक उंदीर राहत होता. सिंहाला झोप लागली की उंदीर बिळातून बाहेर यायचा आणि सिंहाची आयाळ पकडून खेळत बसायचा. उंदीर अंगावर खेळायला लागला की सिंहाची झोप मोडायची. सिंह जागा होणार असे वाटले की उंदीर पटकन पळून बिळात जायचा. आणि सिंहाला सापडायचा नाही.

एक दिवस सिंहाला झोप लागली आहे असे वाटून उंदीर नेहेमीसारखा सिंहाजवळ गेला. पण सिंह जागाच होता. उंदीर जवळ आलेला पाहून सिंहाने पटकन उंदराला पंजात पकडले.

उंदीर फार घाबरला, थरथर कापू लागला. पण आपण घाबरलो आहोत असे सिंहाला न दाखवता तो सिंहाची विनवणी करू लागला. “महाराज मी चुकलो. मला क्षमा करा. मी परत कधी इकडे येणार नाही. महाराज, मला मारू नका. मला सोडा. मी आपले उपकार कधीही विसरणार नाही. आपण मला कधीही हाक मारलीत तरी मी धावत येईन. मला जमेल ती मदत करीन. आणि आपले उपकार फेडीन”.

उंदराचे बोलणे ऐकून सिंहाला हसूच आले. उंदराचा धीटपणा पाहून कौतुकही वाटले.

“जा, वेडा कुठला. मी जनावरांचा राजा आहे. आणि तू एवढासा उंदीर. तू



मला काय मदत करणार? मला तुझी दया येऊन मी तुला सोडतो. घरी जा. तुझी आई तुझी वाट पहात असेल. परत इकडे येऊ नकोस.” असे सांगून सिंहाने उंदराला सोडले. सिंहाने सोडून देताच उंदराने धूम ठोकली आणि घरी गेला.



पुढे काही दिवसांनी एक पारधी आला. सिंह बसत असे तिथे आपले जाळे पसरून ठेवून निघून गेला. सिंह नेहेमीसारखा झाडाखाली झोपायला आला.सिंहाने जाळे पाहीले नाही व तो तसाच पुढे गेला

आणि जाळे एकदम अंगावर पडले. सिंह अडकला.

आपण अडकलो हे लक्षात येताच सिंह जोरजोराने ओरडू लागला. सिंहाचे ओरडणे ऐकून उंदीर बीळातून बाहेर आला.

"महाराज घाबरू नका. आवाजही करू नका. नाहीतर आवाज ऐकून पारधी येईल. मी आणि माझे सोबती मिळून हे जाळे तोडून महाराजांना बघता बघता मोकळे करू." असे सांगून उंदीर परत बिळात गेला. आणि कितीतरी उंदीर भराभरा बिळातून बाहेर पडले. सगळे मिळून कामाला लागले. दातांनी कुरतडून बोलता बोलता सगळे जाळे तोडून टाकले. सिंह मोकळा झाला.



पारधी येऊन पाहतो तर सिंह तर नाहीच पण जाळेही तुटलेले. हे असे कसे झाले असा विचार करीत बिचारा हात हालवीत परत गेला.

उंदीरही घरी गेला. आपण उपकाराची फेड केली अशा समाधानात. आणि कोण कोणाला कधी उपयोगी पडेल ते सांगता येत नाही असा विचार करीत सिंहही घरी गेला.





❑❑❑

# मांजरी व बगळी

एका मांजरीची एका बगळीशी फार ओळख होती. बगळी फार चांगली होती पण मांजरी फार लबाड होती. तिने एकदा बगळील जेवावयास बोलावले.

बिचारी बगळी भोळी होती. तिला मांजरीची लबाडी काय ठाऊक? ती आनंदाने मांजरीकडे गेली.







मांजरीने एका ताटात खीर आणली आणि बगळीला बोलली "ताई आपण दोघी बहीणी बहीणी. आज एका ताटातच जेवू."

असे बोलून मांजरी जिभेने चटचट खीर चाटू लागली. पण बगळीची चोच लांब होती. तिला ताटातून खीर मुळीच खाता येईना. लबाड मांजरी खीर खातच होती. आणि मधून मधून बगळीला विचारत होती की


"ताई, सावकाश होऊ दे. खीर बरी झाली आहे ना?"


बगळीला राग आला पण ती मुळीच बोलली नाही. उलट काही झाले नाही असे तिने दाखवले. आणि हसत हसत घरी निघून गेली.

पुढे मांजरीची एकदा खोड मोडावी असे तिने ठरवले. काही दिवसांनी तिने मांजरीला आपले घरी जेवावयास बोलावले. मांजरी

आशेने बगळीकडे गेली. पण बगळीने बारीक तोंडाची एक बरणी आणली आणि तीत आंबरस घातला. नंतर तिने मांजरीला खावयास सांगितले व आपणही खाऊ लागली.

बगळीची मान लांब आणि बारीक होती. यामुळे तिला सहज रस खाता येत होता. पण मांजरीचे डोके पडले मोठे. ते काही बरणीत शिरेना. मांजरीने बरीच खटपट केली. पण थेंबभरदेखिल रस पोटात गेला नाही.







मांजरीची धडपड बघून बगळीला मनात हसू येत होते. पण तसे न दाखवता उलट तिने रस खाता खाता मान वर करून मांजरीला विचारले

"हे काय ताई तू काहीच रस खात नाहीस? तुझा रस तर अजून तसाच दिसतो आहे. आजचा बेत तुला आवडला नाही का? पण तुला तर रस फार आवडतो."

मांजर यावर काय बोलणार? ती मनात समजली की बगळीने आपली चांगली खोड मोडली. आणि गुपचूप घरी निघून गेली. याचे नाव जशास तसे.

# कबूतर व मुंगी


एक लहानशी मुंगी नदीवर पाणी पीत होती.पाणी पिता पिता तिचा पाय घसरला. आणि ती नदीत पडली.



जवळच एका झाडावर एक कबूतर बसले होते. ते फार दयाळू होते. मुंगी सारखी वाहून चालली होती. हे पाहून कबूतराने



झाडाचे एक पान तोडले आणि ते नदीत टाकले. पानावर बसून तरंगत मुंगी जमीनीवर आली.





नंतर काही वेळाने एक मुलगा तेथे आला. तो हातातील गोफणीने पाखरे मारीत असे.. कबूतराला पाहताच मुलाने एक दगड उचलला. अणि गोफणीचा नेम धरला. हे पाहून मुंगीने विचार केला की कबूतराने मला मघाशी मदत केली आणि मला वाचवले. आता ते मरत आहे तर मी पण मदत केली पाहीजे.

मग मुंगी हळूच जाऊन मुलाला कडकडून चावली. मुंगी चावताच मुलाचा नेम चुकला आणि गोफणीतून दगड खाली पडला. दगडाचा आवाज ऐकून कबूतर भुरकन उडून गेले.

आपण लोकांना उपयोगी पडलो तर लोक पण आपणाला उपयोगी पडतात.

❑❑❑



# आमची पुस्तके

अ-गट पुस्तकमाला भाग-१ (मुळाक्षरे)
पुस्तकमाला भाग-२ (आकार)
पुस्तकमाला भाग-३ (ईकार)
पुस्तकमाला भाग-४ (उकार)
पुस्तकमाला भाग-५ (एकार)
पुस्तकमाला भाग-६ (ऐकार)
पुस्तकमाला भाग-७ (ओकार)
पुस्तकमाला भाग-८ (औकार)

ब-गट मुळाक्षरांचे पुस्तक
कान्याचे पुस्तक
वेलांटीचे पुस्तक
उकारांचे पुस्तक
एका मात्रेचे पुस्तक
दोन मात्रांचे पुस्तक
ओकाराचे पुस्तक
औकाराचे पुस्तक

जोडाक्षरांचा सराव - २ भाग
कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
लहान शब्दकोश
गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
हस्तपुस्तिका
बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
वयाचा दाखला कसा काढावा ?
शालेय वाचनालय चालवताना